# दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप.बँक लि.,

मुख्य कार्यालय : मोंढा, परळी-वैजनाथ जि.बीड-४३१ ५१५

रजिस्ट्रेशन नंबर : बीएचआर/बीएनके/बी १०६ दि.२४.२.१९६६

THE VAIDYANATH URBAN CO-OP BANK LTD.,PARLI VAIJNATH
SINCE 1966
वैद्यनाथ बँक
अर्थपूर्ण आर्थिक विकास

## नोटीस

(केवळ भागधारकांसाठी)

## ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप. बँक लि., परळी वैजनाथच्या सर्व भागधारक सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक २७.०९.२०२६ रोजी सकाळी ठिक १० वाजता वैद्यनाथ प्रतिष्ठाण, परळी वैजनाथ येथे खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजीत केली आहे. तरी सर्व भागधारकांनी वार्षिक सर्वसाधारण सभेस अगत्यपूर्वक हजर रहावे ही विनंती.

**-: सभेपुढील विषय :-**

विषय क्र. १ : मागील दि. २८/०९/२०२५ रोजी झालेल्या ६० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

विषय क्र. २ : सन २०२५-२०२६ अखेर वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक संमत करणे.

विषय क्र. ३ : सन २०२५-२०२६ सालच्या अंदाजपत्रकापेक्षा जास्तीच्या खर्चास मंजूरी देणे व सन २०२६-२०२७ सालाचे मा. संचालक मंडळाने मान्यता दिलेल्या अंदाजपत्रकास अनुसमर्थन देणे.

विषय क्र. ४ : सन २०२५-२०२६ वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षणाची माहिती घेणे व सन २०२५-२०२६ वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.

विषय क्र. ५ : मा. संचालक मंडळाचे मान्यतेनुसार सन २०२६-२०२७ वर्षाकरिता लेखापरिक्षक यांच्या नेमणुकीस मान्यता देणे व मा. वैधानिक लेखापरीक्षकांचा मेहेनताना ठरविण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास देणे.

विषय क्र. ६ : सन २०२५ - २०२६ या आर्थिक वर्षात भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक सूचना नुसार सामोपचार कर्ज परतफेड योजनेअंतर्गत व्याज, दंडव्याज व इतर वसुली खर्चास मा. संचालक मंडळांने दिलेल्या सवलतीस मान्यता देणे.

विषय क्र. ७ : मा. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

विषय क्र. ८ : मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या बँकेचा लॉंग टर्म पर्सपेक्टीव्ह प्लॅनला मान्यता देणे.

विषय क्र. ९ : स्टाफिंग पॅटर्नला मंजूरी देणे बाबत.

विषय क्र. १० : कायदा कलम २६ (२) (अ) च्या परंतुकान्वये बँकेच्या ६१ व्या वार्षिक सार्वसाधारण सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सभासदांची रजा मान्य करुन सभासदांना क्षमापित करणे.

विषय क्र. ११ : भारतीय रिझर्व बँकेच्या दिनांक २५ जून २०२१ रोजीच्या परिपत्रकातील अ.क्र. ७.४ या नियमास अनुसरून मुख्य कार्यकारी अधिकारी नियुक्ती संदर्भात माहिती सादर करणे.

विषय क्र. १२ : मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आयत्यावेळी आलेल्या विषयांचा विचार करणे.

मा.अध्यक्ष व संचालक मंडळाच्या आदेशानुसार

स्थळ : परळी-वैजनाथ

दिनांक : २१-०८-२०२६

(विनोद खर्चे)

मुख्य कार्यकारी अधिकारी

**-: सभासदांना नम्र सूचना :-**

१. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी ज्या सभासदास सभेपुढे असलेल्या विषयाबद्दल कांही माहिती विचारावयाची असेल त्यांनी दि.२०.०९.२०२६ पर्यंत मुख्य कार्यालयास लेखी कळवावे, अन्यथा त्याचा विचार केला जाणार नाही.

२. गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याच दिवशी, त्याच ठिकणी सकाळी १०.३० वाजता होईल. अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

३. ज्या सभासदांची भाग खरेदी संख्या ८० पेक्षा कमी असेल त्यांनी एकूण ८० भाग (एकूण रू.२,०००/-चे) खरेदी करणे पोटनियमाप्रमाणे अत्यावश्यक आहे. मागील दहा वर्षाच्या अहवालात वारंवार आवाहन करूनही ज्या सभासदांनी एकुण ८० भाग (एकूण रु.२,०००/- चे) खेरदी केले नसतील अशा सर्व सभासदांनी दि.३१.०३.२०२७ पुर्वी सदर भाग खरेदी (परिवर्तित) करणे अनिवार्य आहे.

४. बँकेचा संपूर्ण अहवाल बँकेच्या संकेत स्थळावर (www.vaidyanath.bank.in) उपलब्ध असून सभासदांसाठी अहवालांच्या प्रती बँकेच्या शाखांकडेही उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

५. सभासदांना नांव, पत्ता, मोबाईल क्रमांक, शाखा बदल करणे अथवा वारस नोंद बदल करावयाचा असल्यास त्याची बँकेच्या नोंदणीकृत कार्यालयातील शेअर्स विभागात नोंद करून घ्यावी. (सभासदांनी आपला व्हॉट्सअॅप असलेला मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी बँकेत द्यावा.)

६. सभेची नोटीस बँकेचे मुख्य कार्यालय, मुख्य शाखेसह सर्व शाखांच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

७. सभेस उपस्थित असलेल्या सभासदांनी आपले उपस्थिती प्रमाणपत्र घेऊन जावे.